# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा :- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे पत्र क्र. 2020/कोरोना उपाययोजना/कावी दि. 08.07.2020.
5. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल झालेल्या सुमोटो फौजदारी जनहित याचिका क्र. 01/2020 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश दि. 07.07.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 16 /07/2020.

**परिपत्रक:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 अन्वये मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी असे कळविले आहे की, संदर्भ क्र. 5 अन्वये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात मा. न्यायाधीश अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणत्याही CCC (Covid Care Center), क्वारन्टाईन सेंटर्स, अलगीकरण कक्ष (Isolation Ward), व प्रतिबंधीत क्षेत्र (Containment Zone) यांना अचानक भेटी देणार असल्याचे व सदर भेटीमध्ये वरील ठिकाणी नियुक्त केलेले अधिकारी कर्मचारी अनुपस्थित असल्याचे अथवा आपले कामकाज व्यवस्थितरित्या बजावत नसल्याचे निदर्शनास आल्यास अशा अधिकारी / कर्मचा-यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येईल व त्यांचे विरुद्ध फौजदारी कार्यवाहीसह त्यांना सेवेतून काढून टाकण्याची कारवाई करण्यात येईल असे नमूद केले आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 व 3 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभाविपणे राबविण्याचे अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना असे सूचित करित आहे की, त्यांनी कोविड-19 चे प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे अनुषंगाने त्यांना नेमून देण्यात आलेले कर्तव्य नियमितपणे उपस्थित राहून चोखपणे पार पाडावे. नेमून दिलेल्या कर्तव्यावर अनुपस्थित राहिल्यास अथवा त्यामध्ये कसलाही निष्काळजीपणा, हलगर्जीपणा, कामचुकारपणा केल्याचे अथवा कर्तव्यात कसूर केल्याचे दिसून आल्यास अशा अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" तसेच संदर्भ क्र. 5 अन्वये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार गुन्हा



Scanned by CamScanner

दाखल करण्यात येईल व त्यांचेविरुद्ध फौजदारी कार्यवाहीसह त्यांना सेवेतून काढून टाकण्याची कारवाई करण्यात येईल याबाबत सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

सर्व शासकीय कार्यालयप्रमुख जिल्हा उस्मानाबाद यांनी हे परिपत्रक आपले अधिनस्थ सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. अधिष्ठाता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र, उस्मानाबाद.
4. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद.
5. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
6. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
7. जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद.
8. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उस्मानाबाद.
9. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
10. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
11. विभाग नियंत्रक, रा. प. उस्मानाबाद.
12. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
13. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
14. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
15. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सा.प्र./ग्रा. पं./स्वच्छता व पाणीपुरवठा/महिला व बाल विकास जि. प. उस्मानाबाद.
16. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
17. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, उस्मानाबाद.
18. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
19. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. उस्मानाबाद.
20. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि. प. उस्मानाबाद.
21. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
22. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
23. सर्व शासकीय कार्यालयप्रमुख जिल्हा उस्मानाबाद.
24. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner